## सिंगापूरच्या राष्ट्रपतींची भारत भेट (14-18 जानेवारी 2025)

16 जानेवारी, 2025

सिंगापूरचे महामहिम राष्ट्रपती श्री. थर्मन षण्मुगरत्नम 14-18 जानेवारी 2025 दरम्यान औपचारिक भारत भेटीवर होते. राष्ट्रपती थर्मन यांच्या समवेत त्यांच्या पत्नी श्रीमती जेन इट्टोगी षण्मुगरत्नम या देखील होत्या. तसेच शिष्टमंडळात श्री. ची होंग टाट (वाहतूक मंत्री, द्वितीय अर्थमंत्री सिंगापूर) आणि श्रीमती सिम ॲनन (वरिष्ठ राज्य मंत्री, परराष्ट्र मंत्री, सिंगापूर) आणि  सिंगापूर संसद सदस्य, अधिकारी वर्गाचा समावेश होता. राष्ट्रपती थर्मन यांची पहिलीच औपचारिक भारत भेट होती.

2. राष्ट्रपती थर्मन यांचे आदरणीय राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपती भवन येथे स्वागत केले आणि त्याठिकाणी गार्ड ऑफ ऑनर समारंभ पार पडला.  राष्ट्रपती थर्मन यांनी राजघाट येथे महात्मा गांधींना अभिवादन केले.

3. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती थर्मन यांच्या सोबत चर्चा केली. तसेच त्यांच्या सन्मानार्थ विशेष मेजवानीचे आयोजन केले होते.  उभय राष्ट्रपतींनी भारत-सिंगापूर द्विपक्षीय संबंध प्रस्थापनेच्या 60 व्या वर्षपूर्तीचे औचित्य साधून संयुक्त बोधचिन्हाचे अनावरण केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सिंगापुरच्या राष्ट्रपतींची भेट घेतली. या बैठकीदरम्यान दोन्ही नेत्यांनी व्यापकपणे द्विपक्षीय संबंधाचा आढावा घेतला आणि भारत-सिंगापूर संबंध सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या दिशेने मजबूत करण्यावर चर्चा केली.  तसेच परस्पर स्वारस्याच्या प्रादेशिक आणि जागतिक समस्यांवर देखील विचारांचे आदान-प्रदान करण्यात आले होते.

4. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी राष्ट्रपती थर्मन यांची भेट घेतली.  यासोबतच श्री. नितीन गडकरी (रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री), श्री. जगत प्रकाश नड्डा (आरोग्य व कुटुंब कल्याण आणि रसायने व खत मंत्री), श्रीमती निर्मला सीतारमण (अर्थ व कॉर्पोरेट व्यवहार मंत्री), श्री. पियूष गोयल (वाणिज्य व उद्योग मंत्री), श्री. अश्विनी वैष्णव (रेल्वे, माहिती व प्रसारण आणि इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री), श्री. जयंत चौधरी (राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) कौशल्य विकास व उद्योजकता आणि शिक्षण) यांनी देखील राष्ट्रपती थर्मन यांची भेट घेतली.

5. राष्ट्रपती थर्मन यांची औपचारिक भारत भेट ही भारत आणि सिंगापूर यांच्यातील राजनैतिक संबंधांच्या प्रस्थापनेच्या 60 व्या वर्षपूर्ती समारंभाची सुरुवात मानली जाते. जे दृढ आणि बहुआयामी भागीदारीतून विकसित झाले आहेत.

6.  सिंगापुरचे राष्ट्रपती 17-18 जानेवारी 2025 दरम्यान ओडिशाला भेट देणार आहेत.

7. सिंगापूर हे भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरणाचे आणि इंडो-पॅसिफिक व्हिजनचे प्रमुख आधारस्तंभ आहे. ही भेट भारत-सिंगापूर द्विपक्षीय संबंधातील महत्वपूर्ण टप्पा मानल्या जाणाऱ्या सप्टेंबर 2024 मधील पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतरची महत्वाची भेट होती. ज्यामध्ये भारत-सिंगापूर संबंध सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या पातळीपर्यंत विकसित झाल्याचे पाहायला मिळाले.

नवी दिल्ली

16 जानेवारी, 2025